## आजचे पंचांग

आज श्रीराम नवमी आहे
गुरुवार, दि. २६ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, शुक्लपक्ष, अष्टमी सकाळी ११-४९ पर्यंत नंतर नवमी तिथी, दिवस नक्षत्र– आर्द्रा संध्याकाळी ४-१९ पर्यंत चंद्र रास- मिथुन, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...





एक वचनी एक बाणी
मर्यादा पुरुषोत्तम
श्री राम नवमीच्या
हार्दिक शुभेच्छा



आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. २६ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १८० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### दिल्ली विधानसभा परिसरात बॉम्बस्फोटाची घटना

**नवी दिल्ली** : मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या नियोजित अर्थसंकल्प सादर करण्याच्या काही तास आधी बॉम्बस्फोटाची धमकी आल्यानंतर बुधवारी दिल्ली विधानसभेला बॉम्ब हल्ल्याची धमकी देणारा एक नवीन ईमेल मिळाला, ज्यामुळे सभागृहाचे कामकाज सुरू असतानाही कसून तपासणी करण्यात आली. संपूर्ण विधानसभेच्या आवारात स्निफर डॉग्स आणि बॉम्ब शोधण्याच्या पथकांनी शोध घेतला आणि काहीही संशयास्पद आढळले नाही.

### २०२९ पर्यंत ५० हजार हॉटेल खोल्यांचे लक्ष्य

**अमरावती** : २०२९ पर्यंत ५० हजार खोल्या बांधण्याचे लक्ष्य साध्य करण्याचे निर्देश आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी बुधवारी पर्यटन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. पर्यटन विभागासोबत झालेल्या आढावा बैठकीत मुख्यमंत्र्यांनी राज्य गुंतवणूक प्रोत्साहन मंडळाने (एसआयपीबी) मंजूर केलेल्या प्रकल्पांना गती देण्याचे आवाहन केले.

### कर्नाटकात नेतृत्वबदलाचे संकेत

**अमरावती** : बेंगळुरू कर्नाटकातील आमदारांच्या ग्रुप फोटोशूटमुळे राज्यात नेतृत्व बदल आणि मंत्रिमंडळातील फेरबदलाची शक्यता वर्तवली जात आहे. ग्रुप फोटोशूटच्या वेळेमुळे अटकळ निर्माण झाली, कारण असा व्यायाम सामान्यत: विधानसभेच्या पाच वर्षांच्या कार्यकाळाच्या शेवटी आयोजित केला जातो, जो या प्रकरणात २०२८ मध्ये आहे.

पत्रव्यवहारावरून आरोप-प्रत्यारोप, नेतृत्वावर प्रश्नचिन्ह

# राष्ट्रवादीत अंतर्गत वाद पेटला!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरू असलेला सत्तासंघर्ष आता अधिक तीव्र झाला असून, पक्षाच्या नेतृत्व आणि अधिकारांवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांनी निवडणूक आयोगाला लिहिलेल्या पत्रांवरून आमदार रोहित पवार यांनी गंभीर आरोप करत हा संपूर्ण प्रकार पूर्वनियोजित असल्याचा दावा केला आहे. रोहित पवार यांनी आरोप केला की, अजित पवार यांच्या निधनानंतर अवघ्या काही दिवसांतच पक्षाच्या रचनेत बदल करण्यासाठी आणि कार्यकारी अध्यक्षांकडे सर्व अधिकार केंद्रीत करण्यासाठी योजना आखण्यात आली. १६ फेब्रुवारी रोजी निवडणूक आयोगाला पाठवण्यात आलेल्या पत्रात पक्षाच्या घटनेत दुरुस्ती करून कार्यकारी अध्यक्षांना व्यापक अधिकार देण्याचा प्रयत्न झाल्याचे त्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही निवडणूक आयोगाला पत्र लिहून हस्तक्षेप केला आहे. त्यांनी स्पष्ट केले की, अजित पवार यांच्या निधनानंतर आणि स्वतः राष्ट्रीय अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर झालेल्या कोणत्याही अंतरिम पत्रव्यवहाराकडे दुर्लक्ष करण्यात यावे. त्यांच्या मते, अधिकृतपणे पदभार स्वीकारेपर्यंत अशा निर्णयांना वैधता देता येणार नाही. २८ जानेवारी रोजी बारामतीजवळ झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले होते. त्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आणि सुनेत्रा पवार यांनी चार दिवसांत उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, तर २६ फेब्रुवारी रोजी त्यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली. रोहित पवार यांनी निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या १० आणि २६ फेब्रुवारीच्या कागदपत्रांचा दाखला देत सांगितले की, या पत्रांमुळे कार्यकारी अध्यक्षांकडे सर्व निर्णयक्षम अधिकार देण्याचा प्रयत्न झाला. यामुळे पक्षातील नेतृत्वाचे केंद्रीकरण होऊन लोकशाही प्रक्रिया बाधित होऊ शकते, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. या प्रकरणात केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्या एका वक्तव्याचाही त्यांनी संदर्भ दिला. प्रफुल्ल पटेल हे पक्षाध्यक्ष झाल्याचे वक्तव्य नंतर चुकीचे ठरल्याने, संपूर्ण घटनाक्रम संशयास्पद असल्याचा दावा त्यांनी केला. काही नेत्यांनी पक्षावर नियंत्रण मिळवण्यासाठी नियोजनबद्ध पावले उचलल्याचा आरोपही त्यांनी केला. याशिवाय, अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबतही रोहित पवार यांनी शंका उपस्थित केली आहे. या अपघातामागे केवळ तांत्रिक कारण नसून मोठा कट असू शकतो, असा दावा करत त्यांनी स्वतंत्र गुन्हेगारी चौकशीची मागणी केली. विमान चालवणाऱ्या कंपनीला अपघातानंतरही मोठी आर्थिक देयके दिल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. त्यांनी असेही म्हटले की, अपघातापूर्वी अजित पवार यांच्या निवासस्थानाबाहेर संशयास्पद धार्मिक विधी करण्यात आले होते. या सर्व घटनांचा एकत्रित विचार करता, हा अपघात की घातपात याबाबत सखोल तपास होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेसाठी 'शी-बॉक्स' नोंदणी अनिवार्य

### १० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांच्या आस्थापनांनी अंतर्गत समिती स्थापन करणे बंधनकारक

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे** : कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण मिळावे यासाठी प्रत्येक शासकीय व खाजगी आस्थापनात अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले असून, या समितीची नोंदणी केंद्र शासनाच्या 'शी-बॉक्स' (SHe-Box) पोर्टलवर करणे आवश्यक असल्याचे आवाहन महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या सर्व आस्थापनांनी ही अंतर्गत समिती गठीत करणे बंधनकारक आहे. कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक छळ रोखण्यासाठी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ या कायद्याची देशभरात प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. राज्यात आतापर्यंत २२,०५२ आस्थापनांनी 'शी-बॉक्स' पोर्टलवर नोंदणी केली आहे. मात्र, अजूनही अनेक आस्थापने नोंदणीपासून दूर असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे उर्वरित सर्व शासकीय व खाजगी संस्थांनी तातडीने नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, अन्यथा संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त गुंडे यांनी दिला आहे. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही यंत्रणा अत्यंत महत्त्वाची आहे. न

## अजित पवार विमान दुर्घटना प्रकरणी जोरदार चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेच्या चौकशीवरून सभागृहात तीव्र चर्चा रंगली. आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणातील तपासाची सद्यस्थिती काय आहे, तसेच अपघात की घातपात याबाबत सरकार मौन का बाळगत आहे, असा सवाल उपस्थित केला. रोहित पवार यांनी विशेषतः महाराष्ट्रात एफआयआर दाखल न झाल्याचा मुद्दा उपस्थित करत, कर्नाटकात मात्र गुन्हा नोंदवण्यात आल्याचे नमूद केले. "राज्य सरकार का बोलत नाही, तपास कुठपर्यंत आला आहे?" असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाम भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, या प्रकरणात सखोल तपास सुरू असून डीजीसीए अहवालासह आतापर्यंतच्या चौकशीची माहिती सरकारकडे आहे. "अजित दादांचा अपघात जर घातपात ठरला, तर कोणाचाही बाप असू दे, आम्ही सोडणार नाही. गरज पडली तर मुर्दा खोदून काढू," अशा तीव्र शब्दांत त्यांनी कारवाईचा इशारा दिला. मुख्यमंत्री म्हणाले की, या प्रकरणात कोणतीही साजिश (कॉन्स्पिरसी) आढळल्यास ती पूर्णपणे उघड केली जाईल. "कदाचित तुमच्याइतकी भावना माझ्यात दिसणार नाही, पण आमची भूमिका अजिबात बोथट नाही," असेही त्यांनी रोहित पवारांना उद्देशून स्पष्ट केले.

घाबरून जाऊन अनावश्यक तेल खरेदी टाळण्याचे आवाहन

# इंधन टंचाईच्या अफवा फेटाळल्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : देशात पेट्रोल, डिझेल किंवा एलपीजीचा कोणताही तुटवडा नसल्याचे स्पष्ट करत सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि घाबरून खरेदी टाळण्याचे आवाहन केले आहे. पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर पसरलेल्या टंचाईच्या चर्चेमुळे काही ठिकाणी घबराट निर्माण झाल्याने कंपन्यांनी हे स्पष्टीकरण दिले. देशातील सर्वात मोठी तेल कंपनी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनने स्पष्ट केले की, "पेट्रोल किंवा डिझेलची कमतरता नाही" आणि देशभरातील सर्व इंधन पंपांवर पुरेसा साठा उपलब्ध आहे. कंपनीने इशारा दिला की अफवा पसरल्यामुळे अनावश्यक चिंता निर्माण होऊन पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडनेही काही भागात तुटवड्याच्या बातम्या "पूर्णपणे निराधार" असल्याचे सांगितले. कंपनीने नमूद केले की भारत हा पेट्रोल आणि डिझेलचा निव्वळ निर्यातदार असून कच्चे तेल, पेट्रोल, डिझेल आणि एटीएफचा पुरेसा साठा देशात उपलब्ध आहे. अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी कंपनी पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडनेही याच भूमिकेचा पुनरुच्चार करत देशभरात इंधन पुरवठा स्थिर असल्याचे स्पष्ट केले. ग्राहकांनी अफवांमुळे दिशाभूल न होता नियमित वापर सुरू ठेवावा, असे आवाहन कंपनीने केले. दरम्यान, पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षाचा काही प्रमाणात जागतिक पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळ्यांमुळे कच्च्या तेलाच्या वाहतुकीवर ताण आला असला, तरी भारताने पश्चिम आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि अमेरिका यांसारख्या विविध स्त्रोतांमधून पुरवठा सुरक्षित करून परिस्थिती नियंत्रणात ठेवली आहे. एलएनजी (द्रवरूप नैसर्गिक वायू) पुरवठ्यात काही प्रमाणात व्यत्यय आल्याने प्राधान्यक्रम बदलण्यात आले आहेत. घरगुती वापर आणि सीएनजीसाठी पुरवठा कायम ठेवताना काही औद्योगिक वापरात कपात करण्यात आली आहे. एलपीजीच्या बाबतीत मात्र परिस्थिती तुलनेने संवेदनशील आहे, कारण देशातील सुमारे ६० टक्के मागणी आयातीवर अवलंबून आहे आणि त्यातील मोठा हिस्सा आखाती देशांकडून येतो. त्यामुळे सरकारने घरगुती स्वयंपाकासाठी एलपीजी पुरवठ्याला प्राधान्य दिले असून, हॉटेल-रेस्टॉरंटसारख्या व्यावसायिक वापरात काही प्रमाणात मर्यादा आणण्यात आल्या आहेत.

खरात प्रकरणी कडक कारवाईचा इशारा

# भोंदूगिरीला महाराष्ट्रात स्थान नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : राज्याच्या विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावर भाषण करताना भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावर थेट भाष्य केले. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांची सरमिसळ होऊ नये, असा स्पष्ट संदेश देत भोंदूगिरीला महाराष्ट्रात कोणतेही स्थान नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. विरोधकांनी मांडलेल्या मुद्द्यांचा उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले की, अनेक विषय चर्चेत आले नाहीत, मात्र हा त्यांचा अधिकार आहे. याचवेळी खरात प्रकरणाचा संदर्भ देत त्यांनी समाजाने आत्मपरीक्षण करण्याची गरज अधोरेखित केली. "आपण सर्व श्रद्धाळू आहोत, पण श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात फरक ओळखणे आवश्यक आहे. अंधश्रद्धेमुळे विवेक हरवतो, हे या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे," असे ते म्हणाले. संत परंपरेचा दाखला देत फडणवीस यांनी सांगितले की, संतांनी देवाच्या अस्तित्वाला कधी नाकारले नाही, मात्र अंधश्रद्धेवर कठोर प्रहार केला. "ज्यात सकारात्मकता, प्रामाणिकता आणि कोणाचेही अहित होत नाही, ती खरी श्रद्धा; पण जिथे इतरांचे नुकसान होते, ती अंधश्रद्धा," असे त्यांनी स्पष्ट केले. भोंदूगिरीवर टीका करताना त्यांनी उपरोधिक शैलीत म्हटले की, "जर जादूटोण्याने समस्या सुटत असत्या, तर युद्ध ड्रोनऐवजी लिंबू-मिरचीने लढलो असतो, दहशतवाद टाचण्यांनी संपवला असता आणि निवडणुका एका ठिकाणी बसून जिंकता आल्या असत्या." या वक्तव्याने सभागृहात हलकीशी खसखस पिकली. खरात प्रकरणात कठोर कारवाईचा इशारा देत मुख्यमंत्री म्हणाले की, ज्यांच्याकडे या प्रकरणासंदर्भात माहिती आहे त्यांनी ती शासनाकडे द्यावी. "मदत करणाऱ्यांनाही सोडले जाणार नाही," असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, जादूटोणा प्रतिबंधक कायद्याचे नियम अंतिम टप्प्यात असल्याची माहिती त्यांनी दिली. या प्रकरणातील तपासाबाबत माहिती देताना फडणवीस म्हणाले की, संबंधित गुन्ह्यांत १० वर्षांपेक्षा कमी शिक्षा असल्याने ६० दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्येही हीच मुदत पाळली जाणार आहे.

### श्रीराम नवमीनिमित्त दोन दिवसांची सुट्टी

**लखनौ** : उत्तर प्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकारने रामनवमीच्या निमित्ताने राज्यात अतिरिक्त सुट्टी जाहीर करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. जनभावना आणि भक्तांची सोय लक्षात घेऊन २७ मार्च रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. यापूर्वी ही सुट्टी २६ मार्च रोजी होती. आता ही सुट्टी सलग दोन दिवस असेल. मंदिरांना भेट देणाऱ्या भाविकांच्या वाढत्या संख्येमुळे सरकारने हा निर्णय घेतला असल्याचे सांगितले जात आहे. दरवर्षी रामनवमीच्या निमित्ताने, राज्यभरातील, विशेषतः अयोध्या, वाराणसी आणि इतर धार्मिक स्थळांवरील प्रमुख मंदिरांना लाखो भाविक भेट देतात.

## भारताची रशियाकडून ६ कोटी बॅरल तेलखरेदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील वाढत्या युद्धस्थितीमुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळीवर ताण निर्माण झालेला असताना भारताने ऊर्जा सुरक्षितता मजबूत करण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. रशियाकडून तब्बल ६ कोटी बॅरल कच्च्या तेलाची खरेदी करण्यात आली असून या तेलाचा पुरवठा एप्रिल महिन्यात भारतात होणार आहे. अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील संघर्षामुळे होर्मूझच्या सामुद्रधुनीतील जलवाहतूक मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली आहे. ही सामुद्रधुनी जागतिक तेल पुरवठ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असल्याने त्याचा थेट परिणाम भारतासह अनेक देशांवर झाला आहे. भारताच्या तेल आयातीपैकी मोठा हिस्सा आखाती देशांमधून येत असल्याने या परिस्थितीचा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर भारताने पर्यायी स्रोतांकडे वळत रशियाकडून मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी वाढवली आहे. विशेष म्हणजे, अमेरिकेने रशियन तेल खरेदीसाठी ३० दिवसांची मर्यादित मुभा दिली असून एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यात ही मुदत संपणार आहे. त्यामुळे या कालावधीत भारताने जलदगतीने व्यवहार पूर्ण करत साठा सुरक्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, वाढलेल्या मागणीमुळे रशियाने आपल्या दरांमध्ये बदल केला आहे. यापूर्वी सवलतीच्या दरात मिळणारे रशियन तेल आता ब्रेंट क्रूडच्या तुलनेत ५ ते १५ डॉलर अधिक दराने विकले जात असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे भारताला स्वस्त तेलाचा फायदा काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे. तेल बाजार विश्लेषण करणाऱ्या 'केप्लर' या संस्थेच्या अंदाजानुसार, एप्रिल महिन्यात भारतात येणाऱ्या रशियन तेलाची मात्रा फेब्रुवारीच्या तुलनेत जवळपास दुप्पट असेल.

राज्यभर उत्साहात मतदान, सिंधुदुर्गात ८०% प्रतिसाद

# बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र-गोवा निवडणूक शांततेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई** : बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा निवडणूक २०२६ राज्यातील विविध केंद्रांवर शांततेत आणि उत्साही वातावरणात पार पडली. सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत मतदान प्रक्रिया राबविण्यात आली असून, वकिलांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी, वेंगुर्ले, कुडाळ, ओरोस, मालवण, देवगड आणि कणकवली या सात केंद्रांवर मतदान झाले. जिल्ह्यातील सुमारे १,२०० वकील मतदारांपैकी जवळपास ८० टक्के मतदान झाले असल्याची माहिती देण्यात आली. जिल्ह्यातून बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष अ‍ॅड. संग्राम देसाई हे एकमेव उमेदवार रिंगणात आहेत. राज्य आणि गोव्यातील मिळून सुमारे २,७०,००० मतदार या निवडणुकीत सहभागी झाले असून, १५९ उमेदवारांचे भवितव्य या मतदानावर अवलंबून आहे. एकूण २५ जागांसाठी निवडणूक होत असून त्यापैकी २३ सदस्य निवडून दिले जाणार आहेत. दोन सदस्य पदसिद्ध असतील. १८ पुरुष आणि ५ महिला सदस्यांसाठी मतदान झाले. मतदान 'एकल हस्तांतरणीय मत' पद्धतीने झाले असून किमान ५ पसंती क्रमांक देणे बंधनकारक होते. पहिल्या पसंतीच्या मताला सर्वाधिक महत्त्व आहे. वकील संघटनांचे जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. परिमल नाईक, अ‍ॅड. उमेश सावंत आणि अ‍ॅड. बाळाजी रणशूर यांनी मतदान शांततेत आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्याचे सांगितले. बार कौन्सिल निवडणुकीत राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला असून आता सर्वांचे लक्ष मतमोजणीकडे लागले आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर राज्यातील कायदेविषयक प्रतिनिधित्वाचे चित्र स्पष्ट होणार आहे. राज्यभरातील विविध केंद्रांवर नोंदलेली मतदानाची आकडेवारी पुढीलप्रमाणे. पुणे : ७,२७५, ठाणे : २,५४१, कोल्हापूर : २,२८०, नागर : १,१९२, पनवेल : १,१०६, विद्यापीठ (मुंबई) : १,८८१, सिटी सिव्हिल (मुंबई) : १,३१९, एएडब्ल्यूआय : १,१६०, बीबीए : १,२३६, दादर : ३८५, बांद्रा एमएमसी : ५०३, अंधेरी : ६८१, बोरीवली : ८२०, विक्रोळी : ३२८, दिंडोशी : २२५, कुलाबा (किल्ला) : २२१, कुटुंब न्यायालय : ३३२, एमएसीटी : २८४, सहकारी न्यायालय : १९१, कुर्ला : ३००, वाशी/पनवेल : १,१०६, अलिबाग : ५४४, कल्याण : १,३७३, उल्हासनगर : ६२८, अंबरनाथ : १८४, शाहापूर : २३५, मुरबाड : ९४, वसई : ९६७, राजगुरूनगर : ५३५, बारामती : ७४८, दौंड : २४४, सासवड : २१३, जुन्नर : १९९, पिंपरी : ६६५, सोलापूर : १,६००, पंढरपूर : ५१६, माढा : २४०, बार्शी : ३७०, मोहोळ : १३०, इस्लामपूर : ३४८, श्रीरामपूर : २५६, वैजापूर : १२५, गुरगाव : ४१, सर्वोच्च न्यायालय (दिल्ली) : ७४, डीआरटी : २३४, एमएटी : १८, मझगाव : २४८, मिरा-भाईंदर : १०८, सेव्हरी : ३८५, लेबर कोर्ट : ६१.

## पश्चिम आशिया युद्धामुळे युरिया टंचाईची भीती

### बीडमध्ये ६४ हजार मेट्रिक टन मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड** : पश्चिम आशियातील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीचा थेट परिणाम आता भारतीय शेतीवर दिसू लागला असून, खरीप हंगामापूर्वी युरिया खताच्या संभाव्य टंचाईची भीती व्यक्त केली जात आहे. अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील संघर्षामुळे लिक्विड नॅचरल गॅस पुरवठा विस्कळीत झाला असून, खत उत्पादनावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. बीड जिल्ह्याने आगामी खरीप हंगामासाठी सुमारे ६४ हजार मेट्रिक टन युरियाची मागणी नोंदवली आहे. मात्र सध्याच्या जागतिकपरिस्थितीमुळेप्रत्यक्षात किती साठा उपलब्ध होईल, याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी आणि प्रशासन दोघांमध्येही चिंतेचे वातावरण आहे. युरिया उत्पादनासाठी एलएनजी हा अत्यावश्यक कच्चामाल आहे. भारतातील १८ पेक्षा अधिक खत उत्पादक कंपन्या मोठ्या प्रमाणावर आखाती देश आणि रशियाकडून गॅस किंवा तयार युरियाची आयात करतात. मात्र युद्धामुळे समुद्री वाहतूक आणि पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने एलएनजीचे दर झपाट्याने वाढले आहेत. परिणामी, खत प्रकल्पांना गॅसचा पुरवठा कमी होऊन उत्पादनाची गती मंदावली आहे.

## संपादकीय

# इराण-अमेरिका संघर्षात पाकिस्तानची एंट्री; भारताची कसोटी



**पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर जागतिक राजकारण एका नव्या वळणावर येऊन ठेपले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष हा केवळ दोन देशांपुरता मर्यादित नसून त्याचे पडसाद संपूर्ण जगभर उमटताना दिसत आहेत.**

या संघर्षामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत नवीन आंतरराष्ट्रीय समीकरणे तयार होत आहेत, तर काही जुनी समीकरणे ढासळताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भूमिका, इराणचा ठाम प्रतिकार आणि पाकिस्तानची अचानक वाढलेली मध्यस्थी—हे सर्व घटक एकत्रितपणे जागतिक राजकारण अधिक गुंतागुंतीचे करत आहेत.

संघर्षाच्या सुरुवातीला ट्रम्प प्रशासनाने आक्रमक धोरण स्वीकारत इराणला अल्पावधीत दबावाखाली आणण्याचा प्रयत्न केला. आर्थिक निर्बंध, लष्करी दबाव आणि राजनैतिक एकाकीकरण या माध्यमातून इराणला झुकवण्याचा प्रयत्न झाला. मात्र, इराणने अपेक्षेपेक्षा अधिक ठाम भूमिका घेत या दबावाला प्रतिकार केला. इराणने केवळ आपली लष्करी क्षमता दाखवून दिली नाही, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही सहानुभूती मिळवण्यात यश मिळवले. त्यामुळे अमेरिकेची 'जलद विजय' मिळवण्याची रणनीती अयशस्वी ठरल्याचे स्पष्ट झाले.

याच पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी अचानक युद्धविरामाचा सूर लावल्याचे दिसून आले. परंतु हा युद्धविराम एकतर्फी असल्याने त्याला फारसे औपचारिक महत्त्व प्राप्त झाले नाही. इराणने अमेरिकेच्या चर्चेच्या दाव्यांना फेटाळून लावत आपली स्वायत्त भूमिका कायम ठेवली. यामुळे अमेरिकेची जागतिक प्रतिमा काही प्रमाणात डळमळीत झाल्याचे चित्र निर्माण झाले. आक्रमकतेतून संवादाकडे झालेला हा बदल हा केवळ सामरिक नव्हे, तर राजकीयही असल्याचे मानले जाते. कारण अमेरिकेतील आगामी निवडणुका लक्षात घेता युद्ध दीर्घकाळ चालू राहणे ट्रम्प प्रशासनासाठी राजकीयदृष्ट्या घातक ठरू शकते.

या संपूर्ण घडामोडीत सर्वात लक्षवेधी बाब म्हणजे पाकिस्तानची अचानक वाढलेली भूमिका. पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी अमेरिका आणि इराण यांच्यात मध्यस्थी करण्यासाठी पुढाकार घेतल्याची चर्चा आहे. इस्लामाबादमध्ये संभाव्य चर्चेचे प्रयत्न सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत. पारंपरिकदृष्ट्या अमेरिकेचा सहयोगी असलेल्या पाकिस्तानने या परिस्थितीत स्वतःला 'मध्यस्थ' म्हणून उभे करण्याचा प्रयत्न केला आहे.

पाकिस्तानची ही भूमिका केवळ कूटनीतिक नसून रणनीतिकदृष्ट्याही महत्त्वाची आहे. अमेरिका, इराण आणि आखाती देशांशी असलेल्या संबंधांचा उपयोग करून पाकिस्तान स्वतःची आंतरराष्ट्रीय प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न करत आहे. दीर्घकाळापासून दहशतवादाशी संबंधित आरोपांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर दबावाखाली असलेल्या पाकिस्तानसाठी ही एक मोठी संधी मानली जात आहे. मध्यस्थीच्या माध्यमातून स्वतःला 'शांततेचा दूत' म्हणून सादर करण्याचा प्रयत्न पाकिस्तान करत असल्याचे दिसते.

मात्र, या नव्या समीकरणांमुळे भारतासमोर एक गुंतागुंतीचे 'धर्मसंकट' निर्माण झाले आहे. एका बाजूला अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. विशेषतः ऊर्जा बाजारपेठेवर त्याचा मोठा प्रभाव पडू शकतो. भारतासारख्या ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या देशासाठी ही परिस्थिती चिंताजनक ठरू शकते. तेलाच्या किमतीत वाढ, पुरवठा साखळीतील अडथळे आणि चलनवाढ यांसारख्या समस्यांना भारताला सामोरे जावे लागू शकते. दुसऱ्या बाजूला, जर हा संघर्ष पाकिस्तानच्या मध्यस्थीने संपुष्टात आला, तर पाकिस्तानची आंतरराष्ट्रीय प्रतिमा उंचावण्याची शक्यता आहे. यामुळे दक्षिण आशियातील सामरिक संतुलन बदलू शकते. भारतासाठी ही स्थिती राजनैतिकदृष्ट्या आव्हानात्मक ठरू शकते. पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक मान्यता मिळाल्यास भारताच्या परराष्ट्र धोरणावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ऊर्जा, सुरक्षा आणि कूटनीती या तिन्ही स्तरांवर या संघर्षाचे परिणाम दिसून येत आहेत. पश्चिम आशियातील अस्थिरता जागतिक अर्थव्यवस्थेला हादरे देऊ शकते. त्याचबरोबर, मोठ्या शक्तींमधील स्पर्धा अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर भारताने अत्यंत सावध आणि संतुलित भूमिका घेणे आवश्यक आहे. भारताची परराष्ट्र नीती पारंपरिकपणे 'रणनीतिक स्वायत्तता' या तत्त्वावर आधारित राहिली आहे. अमेरिका आणि इराण या दोन्ही देशांशी भारताचे स्वतंत्र आणि महत्त्वाचे संबंध आहेत. त्यामुळे कोणत्याही एका बाजूला झुकणे भारतासाठी योग्य ठरणार नाही. उलट, दोन्ही देशांशी संतुलन राखत स्वतःचे राष्ट्रीय हित जपणे हेच भारतासाठी सर्वोत्तम धोरण ठरेल.

# भोंदूगिरीचे साम्राज्य आणि समाजाची अधोगती



**» महाराष्ट्रासारख्या संत, समाजसुधारक आणि विवेकवादी परंपरेचा अभिमान बाळगणाऱ्या राज्यात पुन्हा एकदा भोंदूगिरीचा काळा चेहरा समोर आला आहे. अशोक खरात या स्वयंघोषित 'बाबा'च्या प्रकरणाने केवळ काही गुन्हे उघड केले नाहीत, तर समाज, राजकारण आणि प्रशासन यांच्यातील धोकादायक संगनमताचेही दर्शन घडवले आहे.**

महिलांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत त्यांचे लैंगिक शोषण, कोट्यवधींची संपत्ती, जमिनींचे व्यवहार आणि प्रभावशाली लोकांशी संबंध—या सर्व बाबी एकत्र पाहिल्यास हे प्रकरण एका व्यक्तीपुरते मर्यादित राहत नाही; ते एका व्यवस्थेतील खोलवर रुजलेल्या दोषांकडे बोट दाखवते.

अशा प्रकारच्या घटना भारतासाठी नवीन नाहीत. आसाराम, गुरमीत राम रहीम यांसारख्या अनेक भोंदू बाबांनी आधीही श्रद्धेच्या नावाखाली गुन्हेगारीचे साम्राज्य उभे केले आहे. मात्र, प्रत्येक वेळी समाज काही काळ संताप व्यक्त करतो, चर्चा होते, आणि नंतर पुन्हा विस्मरणात जाते. त्यामुळेच अशा प्रवृत्ती पुन्हा डोके वर काढतात. खरात प्रकरण हे त्याच चक्राचे ताजे उदाहरण आहे.

या प्रकरणातील सर्वात धक्कादायक पैलू म्हणजे त्याचे कथित 'कनेक्शन'. विविध राजकीय पक्षांतील नेते, अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते यांच्यासोबतचे त्याचे संबंध दर्शवणारे फोटो आणि व्हिडिओ समोर येत आहेत. यामध्ये रूपाली चाकणकर यांचे नाव पुढे आले आणि त्यानंतरचा राजीनामा हा केवळ 'नैतिक जबाबदारी' म्हणून पाहता येणार नाही. हा प्रसंग व्यवस्थेतील विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. महिलांवरील अत्याचारांविरोधात लढण्यासाठी स्थापन केलेल्या संस्थेच्या प्रमुखांवरच अशा व्यक्तीशी संबंधित असल्याचा आरोप होणे, हे अत्यंत गंभीर आहे. पीडित महिलांनी न्यायासाठी कोणाकडे जावे, हा प्रश्न अधिकच तीव्र होतो. न्यायव्यवस्थेवरील आणि संस्थांवरील विश्वास डळमळीत होणे, हीच अशा प्रकरणांची सर्वात मोठी शोकांतिका आहे.

या प्रकरणाची तुलना प्रज्वल रेवण्णा प्रकरणाशी तसेच जागतिक स्तरावरील जेफ्री एपस्टीन प्रकरणाशी केली जात आहे. यामागील कारण म्हणजे गुन्ह्यांची पद्धत, त्यातील संघटित स्वरूप आणि प्रभावशाली लोकांचा सहभाग. शेकडो व्हिडिओ, पीडितांची संख्या आणि दबावाचे राजकारण—या सर्व गोष्टी एक 'नेटवर्क' असल्याचे सूचित करतात. ही बाब अत्यंत धोकादायक आहे, कारण अशा नेटवर्कमुळे गुन्हेगारांना संरक्षण मिळते आणि पीडितांना न्याय मिळणे कठीण होते.

राजकीय प्रतिक्रिया पाहिल्यास एक विशिष्ट नमुना पुन्हा दिसतो. सुरुवातीला 'ओळख नाही' असा बचाव, त्यानंतर 'कडक कारवाई'ची घोषणा, आणि परिस्थिती बिघडल्यावर राजीनामा—ही प्रक्रिया जणू काही ठरलेलीच असते. पण यामुळे मूळ प्रश्न सुटतो का? या सगळ्या प्रक्रियेत पीडित महिलांचे काय? त्यांच्या आयुष्यावर झालेल्या परिणामांची भरपाई कोण करणार?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन केले आहे. ही सकारात्मक पावले असली, तरी समाजाची अपेक्षा केवळ तपासापुरती मर्यादित नाही. या तपासातून संपूर्ण सत्य बाहेर आले पाहिजे. खरातने एवढी संपत्ती कशी उभी केली? त्याला राजकीय किंवा प्रशासकीय पाठबळ कोणी दिले? तक्रारदारांवर दबाव कोणी आणला? आणि सर्वात महत्त्वाचे—अशा प्रकारचे गुन्हे इतक्या काळ लपून कसे राहिले? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय या प्रकरणाचा खरा न्याय होणार नाही. अन्यथा, हा देखील एक 'केस स्टडी' बनून राहील आणि काही वर्षांनी पुन्हा अशाच प्रकारचे प्रकरण समोर येईल. या सर्व घटनांमागे एक मोठा सामाजिक प्रश्न आहे—अंधश्रद्धा आणि 'बाबा-बुवा' संस्कृती. समाजातील मोठा वर्ग अजूनही संकटाच्या काळात वैज्ञानिक किंवा तर्कशुद्ध मार्गाऐवजी अशा व्यक्तींकडे धाव घेतो. भीती, असुरक्षितता आणि अज्ञान यांचा फायदा घेऊन हे भोंदू लोक स्वतःचे साम्राज्य उभे करतात. श्रद्धा ही वैयक्तिक बाब असली, तरी अंधश्रद्धा ही सामाजिक समस्या बनते, आणि तिचा शेवट अनेकदा शोषणातच होतो.

महाराष्ट्राची ओळख ही संत आणि समाजसुधारकांची भूमी म्हणून आहे. संत तुकाराम, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अंधश्रद्धेविरोधात आणि सामाजिक अन्यायाविरोधात आयुष्यभर लढा दिला. पण आजच्या काळात त्यांच्या विचारांचा प्रभाव कमी होत चालल्याचे दिसते. समाजात विवेकापेक्षा अंधश्रद्धेला जास्त महत्त्व दिले जात आहे, ही चिंतेची बाब आहे. यात राजकारणाची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. नागरिक मोठ्या संख्येने अशा 'बाबा'कडे जातात, त्यामुळे राजकीय नेतेही त्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करतात. यामुळे त्या 'बाबा'चा प्रभाव आणखी वाढतो. काही वेळा ते निवडणुकांमध्येही अप्रत्यक्ष भूमिका बजावतात. अशा प्रकारे धर्म, राजकारण आणि पैसा यांचे एक धोकादायक त्रिकोण तयार होतो. या त्रिकोणामुळे केवळ सामाजिक नव्हे, तर प्रशासकीय यंत्रणाही प्रभावित होते. निर्णय प्रक्रियेत हस्तक्षेप, तपासात अडथळे आणि दबावाचे राजकारण—या सर्व गोष्टी लोकशाहीसाठी घातक आहेत.

त्यामुळे अशा प्रवृत्तींचा वेळीच बंदोबस्त करणे अत्यावश्यक आहे.

# दिव्यांग बालकांसाठी 'अंगणवाडी प्रोटोकॉल'चे विमोचन

## समावेशक शिक्षणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर – मंत्री आदिती तटकरे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** दिव्यांग बालकांना मुख्य प्रवाहात आणून त्यांना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. महिला व बालविकास मंत्री Aditi Tatkare यांच्या हस्ते 'दिव्यांग बालकांसाठी अंगणवाडी प्रोटोकॉल'चे विमोचन करण्यात आले. ० ते ६ वयोगटातील बालकांसाठी हा प्रोटोकॉल अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आयोजित 'प्रारंभिक शिक्षणातून विकसित भारताची पायाभरणी' या राज्यस्तरीय परिसंवादात हा कार्यक्रम पार पडला. एकात्मिक बालविकास सेवा योजनेतर्फे आयोजित या परिसंवादात राज्यभरातील तज्ज्ञांनी सहभाग नोंदवला.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, अंगणवाडीच्या माध्यमातून दिव्यांग बालकांना सर्वसमावेशक शिक्षण देण्यावर भर दिला जात आहे. नवीन प्रोटोकॉलमुळे अंगणवाडी सेविकांना दिव्यांग मुलांशी कसे वागावे, त्यांना शिक्षण कसे द्यावे आणि इतर मुलांमध्ये समावेशकतेची भावना कशी निर्माण करावी, याबाबत मार्गदर्शन मिळणार आहे.

या उपक्रमांतर्गत बालकांमधील व्यंग लवकर ओळखणे, योग्य उपचारासाठी मार्गदर्शन करणे, पोषणाबाबत माहिती देणे आणि बालस्नेही पद्धतीने शिक्षण देण्यासाठी व्हिडिओ व शैक्षणिक सामग्री उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच राज्यातील सर्व दिव्यांग बालकांची माहिती संकलित करून आरोग्य व दिव्यांग कल्याण विभागाशी समन्वय साधला जाणार आहे.

या कार्यक्रमात मुख्य सचिव Rajesh Agrawal, आयुक्त माधवी सरदेशमुख, उपायुक्त विजय क्षीरसागर, सहआयुक्त संगीता लोंढे आणि रॉकेट लर्निंगचे सह-संस्थापक सिद्धांत सचदेवा उपस्थित होते.

दरम्यान, 'ई-आकार कुशल अंगणवाडी' उपक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका आणि बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

परिसंवादात बालकांच्या आयुष्यातील पहिले १००० दिवस, धोरण ते अंमलबजावणी आणि परिणामकारक भागीदारी या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

राज्यातील प्रत्येक गावापर्यंत "पोषण भी – पढाई भी" हा उद्देश साध्य करण्यासाठी महिला व बालविकास विभाग कार्यरत असून, या नव्या प्रोटोकॉलमुळे समावेशक शिक्षणाला अधिक बळ मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# कांदा उत्पादकांसाठी उपाययोजनांची गती वाढणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी सचिवस्तरीय समिती स्थापन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. विधानभवनात झालेल्या बैठकीत त्यांनी हा निर्णय जाहीर केला.

दरवर्षी उद्भवणाऱ्या कांदा संकटावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी कृषी, वित्त आणि पणन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती तयार करण्यात येणार आहे. ही समिती तातडीच्या उपाययोजनांसोबतच दीर्घकालीन धोरणांची अंमलबजावणी सुचवणार आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, कांद्याचे उत्पादन वाढत असले तरी त्याला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. यासाठी निर्यात वाढवणे आणि दर स्थिर ठेवण्यासाठी केंद्र सरकारशी समन्वय साधला जाणार आहे. तसेच व्यापाऱ्यांकडून होणारे गैरप्रकार रोखण्यावरही भर दिला जाणार आहे.

नाशिक, पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर या प्रमुख कांदा उत्पादक जिल्ह्यांमध्ये 'क्रॉप डायव्हर्सिफिकेशन'चा पर्यायही तपासण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न देणाऱ्या पिकांकडे वळवून पुढील दोन ते तीन वर्षांत उत्पादन आणि पुरवठा साखळी संतुलित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी अल्पकालीन उपाययोजनांसोबतच ठोस दीर्घकालीन धोरण राबवण्याची गरज असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# दापोडी-गवळीमाथा 'झिरो वेस्ट स्लम' उपक्रमाची झेप

## २४ दिवसांत ९१६ टन कचऱ्याचे व्यवस्थापन; कचरा विलगीकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या दापोडी आणि गवळीमाथा परिसरात राबविण्यात येत असलेल्या 'झिरो वेस्ट स्लम' उपक्रमाने कचरा व्यवस्थापनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले आहे. या उपक्रमांतर्गत १ मार्च ते २४ मार्च २०२६ या अवघ्या २४ दिवसांत तब्बल ९१६ टन कचऱ्याचे सुरक्षित व शाश्वत व्यवस्थापन करण्यात आले आहे.



महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, संकलित कचऱ्यामध्ये विविध प्रकारांचा समावेश आहे. यात सुमारे ६२०.३८ किलो सुका कचरा, ३.२९ टन ओला कचरा, २८०.५० किलो सॅनिटरी कचरा आणि ११.९५ किलो घातक घरगुती कचऱ्याचे वर्गीकरण करून योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली आहे. या प्रक्रियेमुळे कचऱ्याचे वैज्ञानिक व्यवस्थापन आणि पर्यावरणपूरक हाताळणी शक्य झाली आहे.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे तसेच क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे आणि पूजा दुधनाळे यांच्या समन्वयातून या उपक्रमाला गती मिळाली आहे.

विशेष म्हणजे, गेल्या २४ दिवसांत दापोडी आणि गवळीमाथा परिसरातील तब्बल ९,९९४ घरांपर्यंत हा उपक्रम पोहोचला आहे. नागरिकांनी कचरा विलगीकरणाबाबत दाखविलेल्या जागरूकतेमुळे संकलन, वर्गीकरण आणि विल्हेवाट प्रक्रियेत लक्षणीय सुधारणा झाली आहे. घराघरांतून ओला, सुका, सॅनिटरी आणि घातक कचरा वेगळा देण्याची सवय लागल्याने कचरा व्यवस्थापन अधिक सुलभ झाले आहे. 'झिरो वेस्ट स्लम' या संकल्पनेत कचरा निर्माण होण्याच्या स्रोतावरच त्याचे योग्य विलगीकरण, पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती यावर भर दिला जातो. त्यामुळे कचऱ्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होते, तसेच पर्यावरणावर होणारा ताणही कमी होतो. या उपक्रमामुळे परिसरातील स्वच्छता सुधारली असून नागरिकांच्या आरोग्यावरही सकारात्मक परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी नागरिकांना या उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे. "घरगुती कचरा योग्य पद्धतीने वर्गीकरण करून दिल्यास कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी होऊ शकते. स्वच्छ आणि हरित शहर घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची आहे," असे त्यांनी नमूद केले.


एकूणच, दापोडी आणि गवळीमाथा येथील 'झिरो वेस्ट स्लम' उपक्रम हा शाश्वत कचरा व्यवस्थापनाचा आदर्श नमुना ठरत असून, पिंपरी-चिंचवड शहर स्वच्छतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकत असल्याचे स्पष्ट होत आहे.

## स्वतंत्र मुद्रांक कार्यालयासाठी आमदार शंकर जगताप यांचा पुढाकार; महसूलमंत्र्यांकडून सकारात्मक संकेत

# पिंपरी-चिंचवडकरांची आता 'पुणेवारी' थांबणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना मुद्रांक शुल्क आणि दस्त नोंदणीसंदर्भातील कामांसाठी पुण्याला करावी लागणारी वारंवार पायपीट लवकरच थांबण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शहरासाठी स्वतंत्र 'सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी' कार्यालय मंजूर करण्याची मागणी आमदार शंकर जगताप यांनी राज्य सरकारकडे केली असून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती आहे.




शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार आणि वाढत्या मालमत्ता व्यवहारांमुळे पिंपरी-चिंचवडमध्ये मुद्रांक शुल्कातून मोठ्या प्रमाणात महसूल जमा होतो. मात्र, दस्त नोंदणीनंतरची कामे—जसे की मुद्रांक शुल्क परतावा, दस्त दुरुस्ती, अपील दाखल करणे—यासाठी नागरिकांना पुण्यातील मुख्य कार्यालयावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे वेळ आणि पैशांचा अपव्यय होत असून नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागतो.

सध्या पिंपरी, चिंचवड, भोसरी, वाकड, थेरगाव, पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, सांगवी, आकुर्डी आणि रावेत या भागांतील नागरिकांना या कामांसाठी पुण्यात जावे लागते. जरी काही दुय्यम निबंधक कार्यालये पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत असली तरी त्यांचे प्रशासकीय नियंत्रण पुण्यातूनच होत असल्याने प्रक्रिया विलंबित होते.

> "पिंपरी-चिंचवडच्या विकासासाठी स्वतंत्र मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय होणे अत्यावश्यक आहे. यामुळे नागरिकांची पुण्यात होणारी पायपीट थांबेल आणि सेवा अधिक जलद मिळेल. महसूलमंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून लवकरच निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे."
>
> — **शंकर जगताप**, आमदार, पिंपरी-चिंचवड

या पार्श्वभूमीवर स्वतंत्र मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाची स्थापना ही काळाची गरज असल्याचे आमदार जगताप यांनी स्पष्ट केले. हे कार्यालय मंजूर झाल्यास स्थानिक पातळीवर नागरिकांना जलद आणि सुलभ सेवा उपलब्ध होणार असून प्रशासकीय प्रक्रियेत मोठी गती येईल. दरम्यान, महसूल विभागात पारदर्शकता आणि कार्यक्षमतेसाठी सरकारने घेतलेल्या निर्णयांचा उल्लेख करत जगताप यांनी 'गुड गव्हर्नन्स' संकल्पनेला बळ मिळत असल्याचे सांगितले.

ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना जलद सेवा देण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# राज्यपालांच्या हस्ते 'ड्रायव्हर्स ऑफ चेंज' पुरस्कारांचे वितरण

## १५ युवा उद्योजक व नवोन्मेषकांचा गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील आणि देशातील नवोन्मेषी युवकांचा गौरव करत राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते 'इंडिया टुडे ग्रुप–महिंद्रा ड्रायव्हर्स ऑफ चेंज' पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आले. मंगळवारी मुंबईत झालेल्या कार्यक्रमात १५ उत्कृष्ट युवा उद्योजक आणि नवोन्मेषकांना सन्मानित करण्यात आले. यामध्ये नव्या नवेली नंदा, मोना सिंह, जेनेलिया देशमुख यांचाही समावेश होता. यावेळी राज्यपालांनी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करत नाविन्यपूर्ण कल्पनांना उद्योगांमध्ये रूपांतरित करून देशाच्या स्टार्टअप संस्कृतीला चालना दिल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. भारत ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप परिसंस्था असून दोन लाखांहून अधिक स्टार्टअप्स आणि १०० पेक्षा अधिक 'युनिकॉर्न' कंपन्या देशात कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले. एकट्या २०२५ मध्येच ४४ हजारांहून अधिक नवीन स्टार्टअप्सची नोंदणी झाली असून त्यातून २१ लाखांपेक्षा जास्त रोजगार निर्माण झाले आहेत. लहान शहरांमधूनही मोठ्या प्रमाणावर स्टार्टअप्स पुढे येत असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईसह पुणे, नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर ही शहरे नवोन्मेषाची केंद्रे बनत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. 'स्कूल कनेक्ट' उपक्रमाद्वारे ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रेरित करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. पुरस्कार विजेत्यांनी देशातील युवकांना प्रेरणा देत मोठी स्वप्ने साकार करण्याचे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### धामणी सिंचन योजनेला वीजजोडीची आशा

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील धामणी येथील उपसा सिंचन योजनेला वीजजोड देण्याच्या दृष्टीने हालचालींना वेग आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार महावितरणचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी धामणीखिंड परिसरातील डिंभा धरणाच्या कालव्यावर सुरू असलेल्या सोलर प्रकल्पाची पाहणी केली. वीजअभावी बंद असलेल्या नऊ उपसा सिंचन योजनांमुळे शेतकरी अडचणीत होते. ३०० शेतकऱ्यांच्या आंदोलनानंतर ही पाहणी झाली. लवकरच सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत असून शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

### पहाडदरा ठाकरवाडीत पाणीटंचाईवर दिलासा



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील पहाडदरा येथील ठाकरवाडीत तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर अखेर पंचायत समितीच्या माध्यमातून पाण्याचा टँकर सुरू करण्यात आला आहे. गेल्या ९-१० दिवसांपासून पाण्याअभावी महिलांना सुमारे एक किलोमीटर अंतरावरून डोक्यावर हंडे वाहून पाणी आणावे लागत होते. स्थानिक ग्रामस्थांनी ही समस्या पंचायत समिती सदस्य अंकिता वाळुंज यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने गटविकास अधिकारी प्रमिला वाळूंज यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्या पुढाकारातून ठाकरवाडीत टँकर सेवा सुरू करण्यात आली असून ग्रामस्थांनी याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

---

**मंत्री आशिष शेलार : राजगुरुनगरात 'वंदे मातरम' सार्धशताब्दी वर्षानिमित्त भव्य सांस्कृतिक सोहळा**

# क्रांतिकारकांच्या बलिदानाची महाराष्ट्र प्रेरणादायी भूमी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** हुतात्मा शिवराम हरी राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव यांच्या शहीद दिनानिमित्त 'वंदे मातरम'च्या सार्धशताब्दी वर्षानिमित्त राजगुरुनगर येथे भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी उपस्थित राहून महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेचा गौरव करत क्रांतिकारकांच्या योगदानाची आठवण करून दिली.

कार्यक्रमात बोलताना मंत्री शेलार म्हणाले, "महाराष्ट्र ही प्रेरणादायी नेतृत्व, कर्तृत्व आणि महापुरुषांची भूमी आहे. देशासाठी बलिदान देणाऱ्या क्रांतिकारकांचे योगदान कधीही विसरले जाणार नाही." त्यांनी 'वंदे मातरम' या गीताचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, प्रत्येक क्रांतिकारकाच्या घोषणांमध्ये आणि आंदोलनांमध्ये या गीताची प्रेरणा होती. या गीताने स्वातंत्र्यलढ्यात जनतेमध्ये ऊर्जा आणि देशभक्ती जागवली.

'वंदे मातरम'ला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यभर विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. "राज्यातील ३५८ तालुक्यांमध्ये कौशल्य विकास कार्यक्रम, सामूहिक 'वंदे मातरम' गायन आणि विविध सांस्कृतिक उपक्रम वर्षभर आयोजित केले जातील," असे त्यांनी सांगितले.

यावेळी हुतात्मा राजगुरू विकास आराखड्याबाबतही त्यांनी भाष्य केले. "या आराखड्याबाबत सभागृहात निवेदन प्राप्त झाले असून, जमीन संपादनासंदर्भात लवकरच निर्णय घेतला जाईल. भीमाशंकर व खेड तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गासाठी शिखर समितीची मान्यता घेऊन निधी उपलब्ध करून दिला जाईल. या पावन भूमीचा सर्वांगीण विकास करणे हे सरकारचे ध्येय आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात खेडचे आमदार बाबाजी काळे यांनीही हुतात्मा राजगुरू जन्मस्थळ राष्ट्रीय स्मारकाच्या कामांचा आढावा घेतला. "या स्मारकासाठी २५४ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर झाला असून, त्यापैकी १०४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, स्मारक परिसरातील जमीन संपादनाचा प्रश्न अद्याप प्रलंबित आहे. बाधित कुटुंबांना योग्य मोबदला मिळावा," अशी मागणी त्यांनी केली. तसेच भीमाशंकर विकास आराखड्यात खेड तालुक्याचा समावेश करावा, अशीही त्यांनी सूचना केली.

या कार्यक्रमाला केंद्रीय सांस्कृतिक विभागाचे सचिव विवेक अग्रवाल, राज्याचे सचिव किरण कुलकर्णी, नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर, प्रांताधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार प्रशांत बेडसे, पोलिस उपअधीक्षक अमोल मांडवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. शहरातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान क्रांतिकारकांच्या इतिहासावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. मंत्री शेलार यांनी या प्रदर्शनाला भेट देऊन पाहणी केली आणि त्याचे कौतुक केले. एकूणच, 'वंदे मातरम'च्या १५० वर्षांच्या स्मरणार्थ आयोजित या कार्यक्रमातून देशभक्तीची भावना जागृत करण्याचा आणि नव्या पिढीला क्रांतिकारकांच्या बलिदानाची जाणीव करून देण्याचा प्रभावी प्रयत्न करण्यात आला.

---

## ओतूर पोलिस ठाण्यात ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी स्वीकारला पदभार

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**आळेफाटा :** जुन्नर तालुक्यातील ओतूर पोलिस ठाण्यात सहाय्यक पोलिस निरीक्षकपदी ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दि. २४ रोजी पदभार स्वीकारला. त्यांच्या नियुक्तीमुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट होईल, असा विश्वास माजी सहाय्यक पोलिस निरीक्षक लहू थाटे यांनी व्यक्त केला.

ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी यापूर्वी विविध ठिकाणी कार्य करताना प्रभावी कामगिरी बजावली असून गुन्हेगारी नियंत्रण, जनसंपर्क आणि तातडीने निर्णय घेण्याच्या त्यांच्या कार्यशैलीमुळे ते ओळखले जातात. ओतूर परिसरातील स्थानिक समस्या लक्षात घेऊन सर्व घटकांशी समन्वय साधत काम करण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, सहाय्यक पोलिस निरीक्षक लहू थाटे यांना ओतूर पोलिस ठाण्यातर्फे निरोप देण्यात आला. त्यांच्या कार्यकाळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केलेल्या कामगिरीचे सहकाऱ्यांनी कौतुक केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पदभार स्वीकारल्यानंतर बाजगिरे म्हणाले, "नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. यासाठी नागरिकांनीही पोलिसांना सहकार्य करावे." या प्रसंगी स्थानिक ग्रामस्थ, ज्येष्ठ पत्रकार बापू रसाळे, कैलास बोडके, पोलिस पाटील किरण भोर, पंचायत समिती सदस्य जयशिंग पोटे, फिरोज पठाण, छोटू मणियार आदींनी बाजगिरे यांचे स्वागत केले.

---

## आळंदीत रामजन्मोत्सवानिमित्त भक्तीमय वातावरण; धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

**कीर्तन, अभिषेक, संगीत-नृत्य सादरीकरणातून रामभक्तांचा सहभाग**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** येथील आवेकर भावे रामचंद्र संस्थानच्या श्री राम मंदिरात रामजन्मोत्सवानिमित्त गुरुवारी (दि. २६) विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले असून परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला आहे.

सोहळ्याची सुरुवात वेद पाठशाळेच्या मंत्रोच्चारात रुद्राभिषेकाने झाली. त्यानंतर ज्ञानेश्वर महाराज कपलानेबुवा यांच्या हृदयस्पर्शी वाणीतून नारदीय कीर्तन सेवा सादर होणार आहे. यासोबतच भरतनाट्यम, अभंग, भजन, शास्त्रीय संगीत आणि वाद्यसंगीत अशा विविध कलाप्रकारांनी भक्तांची मने जिंकली. डॉ. परिमल फडके यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेले भरतनाट्यम, पंडित रमाकांत पराजपे यांचे वाद्यसंगीत, तसेच हरिभक्त पारायण ज्ञानेश्वरी ताई रोकडे महाराज, रामकृष्णजी गरड महाराज, मुक्ता कुलकर्णी, सई देशपांडे, नितीन आवेकर, संजय भावे, अर्पणा केळकर, अमिता घुगरी, तुषार रिठे, हेमंत आठवले, अमित खरे आदी कलाकारांच्या सादरीकरणाने कार्यक्रम रंगला.

याशिवाय वारकरी भजन, वायलिन वादन आणि अभंगगायनानेही वातावरण भक्तिरसात रंगून गेले. या सोहळ्यात सुमारे २०० भाविकांचा सत्कार करण्यात आला.

संस्थानचे मुख्य विश्वस्त राहुल आवेकर यांच्यासह विश्वस्त मंडळाने कार्यक्रमाचे आयोजन केले. रामजन्मोत्सवाच्या दिवशी पूजा, अभिषेक, नारदीय कीर्तन आणि श्रींची पालखी नगरप्रदक्षिणा हरिनामाच्या गजरात काढण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या निमित्ताने भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

---

## लिफ्ट इरिगेशन पाणीपट्टीत १० पट वाढ; दर तात्काळ रद्द करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**इंद्रायणी, भीमा-भामा नदीपात्रातील दूषित पाण्यावरही वाढीव दर; पुणे जिल्ह्यात संतापाची लाट**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** पुणे जिल्ह्यातील खेड, आळंदी, शिरूर-हवेली तसेच खराडी-चंदननगर परिसरातील शेतकऱ्यांनी लिफ्ट इरिगेशन योजनांवरील पाणीपट्टीत झालेल्या दहापट वाढीव दरांविरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे. इंद्रायणी नदी, भीमा नदी आणि भामा नदी यांसह विविध नद्यांवर शेतकऱ्यांनी स्वखर्चाने उभारलेल्या योजनांवर २०२३ पासून अवाजवी दर लागू करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे.

पूर्वी २०२३ पर्यंत बागायती पिकांसाठी हेक्टरी १८५० रुपये आणि भुसार पिकांसाठी ६०० रुपये इतकी पाणीपट्टी होती. मात्र २०२३ ते २०२६ या कालावधीत पाटबंधारे विभागाने बागायतीसाठी दर वाढवून ८५०० रुपये आणि जिरायती पिकांसाठी तब्बल ६००० रुपये प्रति हेक्टर इतके केले आहेत. या मोठ्या वाढीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून शेती करणे कठीण बनले आहे.

दरम्यान, औद्योगिकीकरण आणि वाढत्या नागरीकरणामुळे नद्यांतील पाणी मोठ्या प्रमाणात दूषित झाले आहे. अनेक ठिकाणी हे पाणी ड्रेनेजसारखे झाल्याने ते शेतीसाठी वापरणे आरोग्यदृष्ट्याही धोकादायक ठरत आहे. अशा परिस्थितीत वाढीव दर आकारणे अन्यायकारक असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये तीव्रतेने व्यक्त होत आहे. या संदर्भात पुणे जिल्हा भारतीय जनसंसदेचे अध्यक्ष पै. बाळासाहेब चौधरी यांनी खेड-आळंदीचे आमदार बाबाजी काळे, खराडीचे आमदार पै. बापूसाहेब पठारे आणि शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांना निवेदन सादर केले आहे. या निवेदनात पाणीपट्टीचे दर २०२३ पूर्वीप्रमाणे पूर्ववत करण्याची आग्रही मागणी करण्यात आली आहे. तसेच पाटबंधारे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या प्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करून पुणे जिल्हा पाटबंधारे विभागाला योग्य निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. सर्वपक्षीय आमदारांनीही विधानसभेत हा प्रश्न उपस्थित करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. आमदार बाबाजी काळे यांनीही या मुद्द्यावर ठाम भूमिका घेतली असून, "सन २०२३-२४ मध्ये करण्यात आलेली अवाजवी करवाढ रद्द करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांवर थकीत रकमेच्या नावाखाली वसुलीची कारवाई केली जात आहे. हा प्रश्न अत्यंत गंभीर असून वेळप्रसंगी निकराचा लढा दिला जाईल," असा इशारा त्यांनी दिला.

---

## चारा व पाणीटंचाईने मेंढपाळ हैराण; शेळ्या-मेंढ्यांची उपासमार तीव्र

**मीना नदी कोरडी; आंबेगावच्या पूर्व भागात जनावरांवर संकट, मेंढपाळांची भटकंती वाढली**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात चारा टंचाईसोबतच तीव्र पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले असून मेंढपाळ व गोपालक अक्षरशः हैराण झाले आहेत. वाढत्या उन्हामुळे नैसर्गिक जलस्रोत आटत चालले असून मीना नदी पूर्णपणे कोरडी पडली आहे. त्यामुळे शेळ्या-मेंढ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या परिसरात आधीपासूनच चाऱ्याची कमतरता जाणवत होती. मात्र सध्या परिस्थिती अधिक बिकट झाली असून शेतातील उरलेसुरले अवशेषही संपत आले आहेत. परिणामी शेळ्या-मेंढ्यांना पुरेसा चारा मिळत नसल्याने त्यांची उपासमार वाढली आहे. अनेक ठिकाणी जनावरांची प्रकृती खालावत असल्याचे चित्र दिसून येत आहे. दुपारच्या कडक उन्हात मेंढपाळांना आपल्या कळपांसह डोंगर-दऱ्यांमध्ये, रानावनात चाऱ्याच्या शोधात भटकंती करावी लागत आहे. मात्र सर्वत्र कोरडी पडलेली नदीपात्रे आणि ओसाड पडलेली कुरणे यामुळे त्यांना फारसा दिलासा मिळत नाही. पाण्याअभावी जनावरांचे मोठे हाल होत असून परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे.

"मूठभर चारा आणि घोटभर पाणी मिळवण्यासाठी दिवसभर फिरावे लागत आहे. जनावरांना सांभाळणे कठीण झाले आहे," अशी व्यथा स्थानिक मेंढपाळांनी व्यक्त केली. या भागात स्थानिक मेंढपाळांसोबत धनगर समाजातील मोठ्या संख्येने कुटुंबे आहेत. तसेच राजस्थानी गीर गोपालकही येथे वास्तव्यास असून त्यांनाही या संकटाचा मोठा फटका बसत आहे.

सध्या मेंढपाळ आणि गोपालक मीना नदीच्या कोरड्या पात्रात पाण्याचा शोध घेताना दिसत आहेत. मात्र पाणी उपलब्ध नसल्याने त्यांची चिंता वाढली आहे. या परिस्थितीत प्रशासनाने तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा आणि जनावरांच्या आरोग्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

---

## "लोकांच्या जिवाशी खेळाल तर गाठ माझ्याशी!"

**शिंदे पाटलांचा संताप; आरएमसी गाड्यांमधून सांडणाऱ्या काँक्रीटमुळे रस्ते धोकादायक**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर (ता. जुन्नर) :** शिरूर-भीमाशंकर राज्य महामार्गावरील रेटवडी घाट आणि गोसासी परिसरात आरएमसी (रेडी मिक्स काँक्रीट) गाड्यांमधून सांडणाऱ्या ओल्या सिमेंटमुळे रस्ते अक्षरशः मृत्यूचे सापळे बनल्याने संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा परिषद गटनेते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजयसिंह बाबासाहेब शिंदे पाटील यांनी घटनास्थळी धाव घेत प्रशासनाला धारेवर धरले.

रस्त्यावर सांडलेल्या काँक्रीटमुळे रस्ता निसरडा बनून दुचाकीस्वार, शालेय विद्यार्थी, महिला आणि कामगार वारंवार घसरून जखमी होत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी मांडल्या. परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करताच शिंदे पाटील यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

घटनास्थळीच संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधत त्यांनी कडक शब्दांत सुनावले, "कोणाचे तरी कुटुंब उध्वस्त झाल्यावर जाग येणार का? लोकांच्या जिवाशी खेळण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला?" असा थेट सवाल करत त्यांनी प्रशासनाला इशारा दिला.

यावेळी त्यांनी तातडीने उपाययोजना करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. रस्त्यावर सांडलेले काँक्रीट जेसीबीच्या साहाय्याने हटवून रस्ता स्वच्छ करणे, नियमबाह्य सांडपाणी करणाऱ्या गाड्यांवर दंडात्मक कारवाई करणे आणि भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी लेखी हमी देणे, या मागण्या त्यांनी मांडल्या. अन्यथा संबंधित वाहतूक पूर्णपणे रोखण्यात येईल, असा इशाराही दिला.

या पाहणीवेळी जिल्हा परिषद सदस्य दीप्तीताई भोगाडे, पंचायत समिती सदस्य दिलीप डूबे, सरपंच संतोष गोरडे, आनंदराव काळे यांसह अनेक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिंदे पाटील यांच्या आक्रमक भूमिकेचे ग्रामस्थांनी स्वागत करत प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला.

"नागरिकांच्या जीविताची किंमत कोणत्याही विकासापेक्षा मोठी आहे," असे स्पष्ट करत शिंदे पाटील यांनी प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून दिली. दरम्यान, ही घटना सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, तातडीने उपाययोजना न झाल्यास आंदोलनाची तीव्रता वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

**पंजाबच्या धर्तीवर महाराष्ट्रातही अधिकृत साजरा व्हावा; अॅड. विजयसिंह शिंदे पाटील यांचे मंत्री आशिष शेलार यांना निवेदन**

# हुतात्मा राजगुरूंचा शहीद दिन 'शासकीय' साजरा करण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरूनगर :** क्रांतिकारक शिवराम हरी राजगुरू यांच्या बलिदानाचा सन्मान राखण्यासाठी आणि खेड तालुक्याच्या अस्मितेला न्याय देण्यासाठी महाराष्ट्रातही त्यांच्या शहीद दिनाला शासकीय दर्जा द्यावा, अशी ठाम मागणी पुढे येत आहे. पुणे जिल्हा परिषद गटनेते तथा खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अॅड. विजयसिंह बाबासाहेब शिंदे पाटील यांनी याबाबत पुढाकार घेत राज्य सरकारकडे पाठपुरावा सुरू केला आहे.

मंगळवारी (दि. २४) शहीद दिनानिमित्त राजगुरूनगर येथे आयोजित 'वंदे मातरम्' सार्ध शताब्दी सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान अॅड. शिंदे पाटील यांनी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांची भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन सादर केले. शहीद दिनाला शासकीय सोहळ्याचा दर्जा देण्याबाबत तातडीने निर्णय घेण्याची विनंती त्यांनी यावेळी केली.

यावेळी बोलताना शिंदे पाटील म्हणाले की, पंजाबमध्ये २३ मार्च हा शहीद दिन राज्य सरकारच्या सहभागातून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी होतात. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही हुतात्मा राजगुरूंच्या शहीद दिनाला अधिकृत मान्यता मिळणे आवश्यक आहे. हे केवळ ऐतिहासिक कर्तव्य नसून भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे त्यांनी नमूद केले.

तसेच, राजगुरूनगर येथे होणाऱ्या जयंती व शहीद दिन कार्यक्रमांना शासकीय प्रोटोकॉल मिळावा, अशीही त्यांनी मागणी केली. "जुन्नर येथील शिवजयंती किंवा वढू बुद्रुक येथील कार्यक्रमांप्रमाणेच जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहावेत. यामुळे कार्यक्रमाला अधिकृत स्वरूप मिळेल आणि हुतात्म्यांचा सन्मान अधिक व्यापक होईल," असे त्यांनी स्पष्ट केले.

शिंदे पाटील यांनी पुढे सांगितले की, महाराष्ट्राच्या मंत्रालयासमोर हुतात्मा राजगुरूंचे स्मारक असणे ही अभिमानाची बाब आहे. मात्र त्यांच्या जन्मभूमीत होणाऱ्या कार्यक्रमांना अपेक्षित शासकीय मान्यता मिळत नाही, ही खंत दूर होणे आवश्यक आहे. यासाठी हा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडून सर्वपक्षीय पातळीवर पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला खेड तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ तसेच समर्थ फाउंडेशनचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिंदे पाटील यांच्या या पुढाकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, राज्य सरकार या मागणीवर काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हुतात्मा राजगुरूंच्या बलिदानाचा गौरव अधिकृत पातळीवर साजरा करण्याच्या दिशेने हे पाऊल महत्त्वाचे मानले जात असून, महाराष्ट्रात देशभक्तीच्या परंपरेला नवे बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

## ताशावादक जालिंदर शेवाळे यांना 'आंबेगाव भूषण' राज्यस्तरीय पुरस्कार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील वळती गावचे युवा ताशावादक जालिंदर लहू शेवाळे यांना प्रतिष्ठेचा 'आंबेगाव भूषण' राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. युगप्रवर्तक प्रतिष्ठान, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक व संविधान भवन समिती आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार दिला जातो.

हा गौरव सोहळा १४ एप्रिल रोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त, घोडेगाव येथील अहिल्यादेवी होळकर चौकात सायंकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आला आहे. राज्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला जाणार असल्याची माहिती युगप्रवर्तक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष गौतम खरात यांनी दिली.

लहानपणापासूनच पारंपारिक वाद्यकलेची आवड जोपासणारे जालिंदर शेवाळे यांना त्यांच्या वडिलांकडून, प्रसिद्ध सनईवादक लहू शेवाळे यांच्याकडून वाद्यकलेचे संस्कार लाभले. त्यांनी आपल्या दमदार, तालबद्ध आणि संतुलित वादनशैलीच्या जोरावर पुणे जिल्ह्यासह राज्यभर वेगळी ओळख निर्माण केली आहे. केवळ वादनापुरते मर्यादित न राहता, त्यांनी अनेक तरुणांना या कलेत मार्गदर्शन केले असून पारंपारिक वाद्यकलेच्या जतनासाठी स्पर्धा, सत्कार समारंभ आणि जनजागृती उपक्रमही राबवले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत 'आंबेगाव भूषण' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे या पुरस्काराबद्दल वळती ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## सारांश वृत्त

### जैसलमेरमध्ये वाहन उलटून २ ठार

**जयपूर :** जैसलमेर पोकरण-जैसलमेर मार्गावर बुधवारी दुपारी वाहन उलटून झालेल्या अपघातात दोन जण ठार तर आठ जण जखमी झाले. हे सर्व जण एकाच कुटुंबातील होते आणि रामदेवराला भेट देऊन जैसलमेरमधील थायियत या आपल्या गावी परतत होते. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, गायीला धडक न देण्याचा प्रयत्न करताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि चाचा गावाजवळ ती पलटी झाली.

### लाभार्थ्यांना ३१ मार्चपर्यंत घरांचा ताबा

**हैदराबाद :** हैदराबाद तेलंगणचे गृहनिर्माण मंत्री पी. श्रीनिवास रेड्डी यांनी बुधवारी सांगितले की, इंदिराम्मा गृहनिर्माण योजनेंतर्गत बांधण्यात आलेली एक लाखाहून अधिक घरे ३१ मार्चपर्यंत आणि आणखी एक लाख घरे जूनपर्यंत लाभार्थ्यांना देण्यात येतील. विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री म्हणाले की, पहिल्या टप्प्यात राज्यभरात ४.५० लाख घरे मंजूर करण्यात आली होती, तसेच एकात्मिक आदिवासी विकास एजन्सी (आयटीडीए) कार्यक्षेत्रात चेंचू समुदाय आणि आदिवासींसाठी १२ हजार घरे मंजूर करण्यात आली होती.

### बेंगळूर विमानतळावर गांजा जप्त



**बेंगळूर :** बँकॉकहून भारतात दाखल झाल्यानंतर केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर ५.७९ कोटी रुपयांच्या हायड्रोपोनिक गांजाची तस्करी करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली त्यांनी चेक-इन बॅगेजमध्ये लपवून ठेवलेला १६.५४ किलो हायड्रोपोनिक गांजा जप्त केला, असे बेंगळुरू कस्टम्सने 'एक्स' वर पोस्टमध्ये म्हटले आहे. दोन्ही आरोपींना नार्कोटिक ड्रग्स अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्स (एनडीपीएस) कायद्यांतर्गत अटक करण्यात आली आहे.

## पश्चिम आशिया संकटावर सर्वपक्षीय बैठकीवरून राजकीय वाद

# केंद्र सरकार-विरोधक आमनेसामने!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** नवी दिल्ली पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावण्याचा निर्णय घेतला असला, तरी त्यावरून बुधवारी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार राजकीय वाद रंगला. काँग्रेससह विरोधी पक्षांनी ही बैठक उशिरा बोलावल्याचा आरोप केला, तर भाजपने हे आरोप फेटाळत राष्ट्रीय एकतेचे आवाहन केले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर उपस्थित राहण्याची शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत पश्चिम आशियातील परिस्थितीवर भाष्य केल्यानंतर ही बैठक बोलावण्यात आली आहे. विरोधकांनी मात्र या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला आहे. काँग्रेस खासदार मणिकम टागोर यांनी ही बैठक आधीच व्हायला हवी होती, असे सांगत पंतप्रधानांच्या अनुपस्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. “अशा गंभीर प्रसंगी सर्वपक्षीय बैठकीचे नेतृत्व परंपरेने पंतप्रधान करतात,” असे त्यांनी नमूद केले. याचवेळी काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनी सरकारच्या परराष्ट्र धोरणावरही टीका केली. काही नेत्यांनी भारताचे परराष्ट्र धोरण “तडजोडीचे” असल्याचा आरोप करत, इराणसारख्या देशांबाबत स्पष्ट भूमिका न घेतल्याचे म्हटले. तसेच, एलपीजीसारख्या इंधन पुरवठ्यावर परिणाम होत असल्याचा दावा करत सरकारने याबाबत स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी करण्यात आली. समाजवादी पक्षाच्या खासदार डिंपल यादव यांनीही सरकारच्या दृष्टिकोनामुळे देशांतर्गत अडचणी निर्माण झाल्याचा आरोप केला, तर इतर विरोधी नेत्यांनी पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी ठोस उपाययोजना जाहीर करण्याची मागणी केली. दुसरीकडे, भाजपने विरोधकांच्या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर दिले. केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सरकार सर्व आवश्यक पावले उचलत असल्याचे सांगत अशा संवेदनशील विषयावर राजकारण करू नये, असे आवाहन केले. त्यांनी इंधन टंचाईचे दावेही फेटाळून लावत विरोधकांवर “बेजबाबदार वक्तव्ये” केल्याचा आरोप केला. भाजप खासदार दिनेश शर्मा यांनीही सरकारचा बचाव करत पंतप्रधान मोदी जागतिक स्तरावर शांततेचे दूत म्हणून भूमिका बजावत असल्याचे म्हटले. त्यांनी विरोधकांवर टीका करत राष्ट्रीय मुद्द्यांवर एकत्र येण्याचे आवाहन केले. दरम्यान, पश्चिम आशियातील तणावामुळे भारताच्या ऊर्जा, व्यापार आणि सुरक्षेवर संभाव्य परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता केंद्र सरकारकडून उच्चस्तरीय बैठका आणि आढावा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर होणारी सर्वपक्षीय बैठक महत्त्वाची मानली जात असली, तरी तिच्यावरून निर्माण झालेला राजकीय वाद पुढील काळात अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

## पश्चिम बंगालमध्ये मतदार यादीत तांत्रिक बिघाड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या प्रणालीत झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे मंगळवारी रात्री मोठा गोंधळ उडाला. अनेक मतदारांनी त्यांच्या ईपीआयसी क्रमांकाद्वारे माहिती तपासताना स्वतःची स्थिती “निवाड्याखाली” दाखवली जात असल्याचे आढळले. विशेष म्हणजे, ज्या मतदारांची नावे अंतिम मतदार यादीत आधीच समाविष्ट झाली होती, त्यांनाही हीच स्थिती दिसत होती. या अनपेक्षित त्रुटीमुळे राज्यभरात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. मतदानापूर्वी मतदारांची नोंदणी आणि पात्रता यासंदर्भात ही संवेदनशील प्रक्रिया असल्याने अनेकांनी याबाबत चिंता व्यक्त केली. काही ठिकाणी मतदारांनी आपली नावे वगळली जाण्याची भीतीही व्यक्त केली. निवडणूक आयोगाने मात्र हा प्रकार केवळ तांत्रिक त्रुटी असल्याचे स्पष्ट केले. आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, ही समस्या बहुधा सर्व्हर किंवा बॅकएंड एकत्रीकरणाशी संबंधित होती. “एका टप्प्यावर प्रणालीने चुकून राज्यातील सर्व मतदार ‘निवाड्याखाली’ असल्याचे दर्शविले. प्रत्यक्षात तसे नव्हते. ही केवळ डिस्प्ले एरर होती,” असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. तांत्रिक पथकांनी तातडीने हस्तक्षेप करत सुमारे दोन तासांत ही समस्या दुरुस्त केली, असेही त्यांनी सांगितले. ही गडबड सोमवारी मध्यरात्री आयोगाने पहिली पुरवणी मतदार यादी जाहीर केल्यानंतर अवघ्या २४ तासांत समोर आली. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, सत्ताधारी तृणमूल काँग्रेसने या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. पक्षाने आरोप केला की, या तांत्रिक बिघाडामुळे वैध मतदारांनाही संशयाच्या भोवऱ्यात ढकलले गेले. सोशल मीडियावर पक्षाच्या नेत्यांनी असा दावा केला की, अंतिम यादीत नाव असतानाही अनेक मतदारांना “निवाड्याखाली” दाखवले जात होते, जे गंभीर आहे. विरोधकांनीही या प्रकरणावरून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## अग्निवीरांसाठी २०% नोकरी आरक्षणाचा प्रस्ताव

### चार वर्षांनंतरच्या पुनर्वसनासाठी महत्त्वाचे पाऊल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हमीरपूर :** ‘अग्निपथ’ योजनेअंतर्गत सेवेत असलेल्या अग्निवीरांचा चार वर्षांचा कार्यकाळ २०२७ पासून पूर्ण होऊ लागणार असल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या पुनर्वसनासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सर्व राज्य सरकारांना पत्र लिहून अग्निवीरांसाठी किमान २० टक्के नोकऱ्या राखीव ठेवण्याचे आवाहन केले आहे. सैनिक कल्याण विभागाचे संचालक ब्रिगेडियर मदन शील शर्मा (निवृत्त) यांनी या पत्राची माहिती देताना सांगितले की, हे पत्र थेट राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पाठवण्यात आले आहे. या अनुषंगाने हिमाचल प्रदेश सैनिक कल्याण विभागानेही राज्य सरकारला सविस्तर अहवाल पाठवून या प्रस्तावाचा विचार करण्यास सुरुवात केली आहे. केंद्राच्या प्रस्तावानुसार, राज्यांतील विविध गणवेशधारी सेवांमध्ये जसे की फॉरेस्ट गार्ड, मायनिंग गार्ड, पोलीस कॉन्स्टेबल, फायरमन, माउंटेड पोलीस, जेल वॉर्डन, स्पेशल पोलिस ऑफिसर आणि स्टेट डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स या पदांवर अग्निवीरांसाठी २० टक्के आरक्षण देण्याची सूचना करण्यात आली आहे. यामुळे सैन्य प्रशिक्षण घेतलेल्या तरुणांना नागरी सेवांमध्ये संधी मिळून त्यांचा अनुभव राज्य प्रशासनासाठी उपयोगी ठरेल, असा केंद्राचा विश्वास आहे. या दिशेने काही राज्यांनी आधीच पुढाकार घेतला आहे. हरियाणा हे अग्निवीरांसाठी पोलिस, खाण रक्षक, तुरुंग वॉर्डन आणि इतर गट ‘क’ पदांमध्ये आरक्षण लागू करणारे पहिले राज्य ठरले आहे. त्यानंतर उत्तराखंडनेही पोलिस व इतर गणवेशधारी सेवांमध्ये अशाच प्रकारचे आरक्षण जाहीर केले आहे.

# परदेशी निधीवरील नियंत्रण अधिक कठोर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** परदेशातून येणाऱ्या निधीवर अधिक कडक नियंत्रण आणण्यासाठी केंद्र सरकारने परदेशी योगदान (नियमन) दुरुस्ती विधेयक २०२६ लोकसभेत सादर केले आहे. या विधेयकामुळे परदेशी अनुदानित स्वयंसेवी संस्थांवर (एनजीओ) देखरेख वाढणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांच्या मालमत्तेवर थेट नियंत्रण ठेवण्यासाठी ‘नियुक्त प्राधिकरण’ स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव मांडण्यात आला आहे. गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी हे विधेयक सादर करताना स्पष्ट केले की, परदेशी निधीचा गैरवापर, जबरदस्ती धर्मांतर किंवा वैयक्तिक फायद्यासाठी निधी वापरणाऱ्या घटकांविरुद्ध कठोर कारवाई करणे हा सरकारचा उद्देश आहे. “हे विधेयक धोकादायक नाही, तर गैरवापर करणाऱ्यांसाठीच धोकादायक आहे,” असे त्यांनी ठामपणे सांगितले. सध्या देशात सुमारे १६ हजार संघटना एफसीआरए अंतर्गत नोंदणीकृत असून, त्यांना दरवर्षी अंदाजे २२ हजार कोटी रुपयांचा परदेशी निधी प्राप्त होतो. या मोठ्या आर्थिक प्रवाहावर पारदर्शक आणि नियंत्रित पद्धतीने देखरेख ठेवण्याची गरज अधोरेखित करत सरकारने कायद्यात सुधारणा सुचवली आहे.

नवीन विधेयकातील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे ‘नियुक्त प्राधिकरणा’ची निर्मिती. ज्या संस्थांचे परवाने रद्द झाले, निलंबित झाले किंवा ज्यांनी परवाना सरेंडर केला आहे, अशा प्रकरणांमध्ये त्या संस्थांच्या परदेशी निधीतून निर्माण झालेल्या मालमत्तेचे नियंत्रण या प्राधिकरणाकडे तात्पुरते किंवा कायमस्वरूपी दिले जाईल. यामुळे अशा मालमत्तेच्या वापर, व्यवस्थापन आणि विल्हेवाटीबाबत स्पष्ट कायदेशीर चौकट निर्माण होणार आहे. सध्याच्या कायद्यात मालमत्ता हस्तांतरणाची तरतूद असली तरी तिच्या व्यवस्थापनासाठी स्पष्ट नियम नसल्याने प्रशासकीय अनिश्चितता आणि गैरवापराची शक्यता निर्माण होत असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर नव्या अध्याय अंतर्गत सविस्तर तरतुदी करण्यात आल्या आहेत. विधेयकात आणखी काही महत्त्वाच्या सुधारणा सुचवण्यात आल्या आहेत. c

# निवडणूक आयोगावर ममतांचा हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी बुधवारी भाजप, केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर तीव्र हल्लाबोल करत घटनात्मक संस्थांचा गैरवापर करून लोकशाही धोक्यात आणली जात असल्याचा आरोप केला. मयनागुडी येथील निवडणूक सभेत बोलताना त्यांनी विशेष गहन पुनरावलोकन (एसआयआर)



प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. ममता बॅनर्जी यांनी आरोप केला की, मतदार याद्यांच्या पुनरावलोकनाच्या नावाखाली काही विशिष्ट समुदायांना निवडणूक प्रक्रियेतून वगळले जात आहे. “राजबंशी समाजाची नावे हटवली जात आहेत, महिलांची नावेही काढली जात आहेत. जर या प्रक्रियेमुळे लोकांचे नुकसान झाले, तर त्याची जबाबदारी कोण घेणार?” असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तृणमूल काँग्रेसच्या प्रमुखांनी पुढे दावा केला की, निवडणूक आयोग, केंद्र सरकार आणि भाजप एकत्र येऊन मतदारांचा अधिकार कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. “आज मतदानाचा अधिकार हिरावून घेत आहेत, उद्या एनआरसीच्या माध्यमातून नागरिकत्व काढून घेतील,” असा आरोप त्यांनी केला. सभेत उपस्थितांना आवाहन करताना ममता बॅनर्जी म्हणाल्या, “या लोकांना आणि दिल्लीतील नेत्यांना स्पष्ट संदेश द्या. मागून राजकारण करू नका, समोर येऊन लढा.” त्यांनी निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचेही म्हटले. त्यांनी असा आरोपही केला की, सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला सत्तेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## विश्वासावर आधारित करप्रणालीवर सरकारचा भर

# लोकसभेत वित्त विधेयक मंजूर !

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** लोकसभेने बुधवारी वित्त विधेयक २०२६ मंजूर करत केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणाला विधिमंडळाची मान्यता दिली. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी या विधेयकाद्वारे “विश्वास-आधारित करप्रणाली”, सुधारित राहणीमान आणि अधिक व्यवसाय-अनुकूल वातावरण निर्माण करण्याचा सरकारचा स्पष्ट रोडमॅप मांडला. संसदेतील चर्चेला उत्तर देताना सीतारमण यांनी ठामपणे सांगितले की, भारतातील आर्थिक सुधारणा आता सक्तीच्या उपायांवर नव्हे, तर स्पष्टता, आत्मविश्वास आणि दीर्घकालीन दृष्टीकोनावर आधारित आहेत. “सुधारणा दबावाखाली नव्हे, तर दृढनिश्चयाने केल्या जात आहेत,” असे त्या म्हणाल्या. या विधेयकाचा केंद्रबिंदू म्हणजे करप्रणालीत “विश्वास” हा मूलभूत घटक ठेवणे. करदात्यांवर अनावश्यक तपासणी आणि दबाव टाळून स्वेच्छेने करभरणा वाढवणे, न्यायालयीन वाद कमी करणे आणि पारदर्शकता वाढवणे, हा यामागील उद्देश असल्याचे अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या मते, कर प्रणाली जितकी सोपी आणि विश्वासार्ह असेल तितकी अर्थव्यवस्था अधिक सक्षम होईल. सीतारमण यांनी नमूद केले की, सरकारचा सुधारणा अजेंडा तात्पुरत्या समस्यांवर उपाय शोधण्यापेक्षा दीर्घकालीन आर्थिक वाढ साध्य करण्यावर केंद्रित आहे. यामध्ये कररचना सुलभ करणे, वैयक्तिक करदाते आणि लघु उद्योगांना दिलासा देणे, तसेच व्यवसाय सुलभता वाढवणे या बाबींना प्राधान्य देण्यात आले आहे. विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्राला दिलासा देण्यासाठी महत्त्वपूर्ण बदल सुचवण्यात आले आहेत. अर्थमंत्र्यांनी सांगितले की, तांत्रिक चुका—उदा. खात्यांचे वेळेवर ऑडिट न करणे—यासाठी कठोर दंडाऐवजी निश्चित शुल्काची तरतूद करण्यात आली आहे. “आधी सुविधा, नंतर अंमलबजावणी” हा सरकारचा दृष्टिकोन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यामुळे उद्योजकांवरील दडपण कमी होऊन व्यवसाय करण्यास अनुकूल वातावरण निर्माण होईल, असा सरकारचा विश्वास आहे. राज्यांना महसूल वाटपाच्या मुद्द्यावरही सीतारमण यांनी भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, केंद्र सरकार राज्यांसाठी चालवलेल्या योजनांवर जेवढा खर्च करते, तो उपकर आणि अधिभारातून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा अधिक आहे.

# ‘वंदे मातरम्’ परिपत्रकाविरोधातील याचिका फेटाळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** ‘वंदे मातरम्’ हे गीत अधिकृत कार्यक्रमांमध्ये गाण्याबाबत गृहमंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी फेटाळून लावली. न्यायालयाने ही याचिका “अकाली” आणि “भेदभावाच्या अस्पष्ट भीतीवर आधारित” असल्याचे स्पष्ट करत हस्तक्षेप करण्यास नकार दिला. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांच्या




खंडपीठासमोर मोहम्मद सईद नूरी यांनी ही याचिका दाखल केली होती. याचिकेत असा दावा करण्यात आला होता की, परिपत्रकामुळे काही नागरिकांवर ‘वंदे मातरम्’ गाण्यासाठी अप्रत्यक्ष दबाव निर्माण होऊ शकतो आणि ते धार्मिक स्वातंत्र्यावर परिणाम करू शकते. याचिकाकर्त्यांचे वकील संजय हेगडे यांनी न्यायालयात मांडणी करताना सांगितले की, देशातील सर्व धर्मांचा आदर केला जातो; मात्र, जर लोकांना त्यांच्या इच्छेविरुद्ध राष्ट्रगीत गाण्यास भाग पाडले गेले, तर काहींसाठी ते “निष्ठेचे सक्तीचे प्रदर्शन” ठरू शकते. यावर न्यायालयाने स्पष्ट भूमिका घेतली. न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांनी विचारले की, संबंधित परिपत्रकात राष्ट्रगीत न गाल्यास कोणतीही दंडात्मक कारवाई किंवा शिक्षा नमूद केली आहे का? तसेच, कोणाला जबरदस्तीने गाण्यास भाग पाडल्याची ठोस घटना आहे का? यावर समाधानकारक उत्तर न मिळाल्याने न्यायालयाने याचिका ग्राह्य धरली नाही. खंडपीठाने निरीक्षण नोंदवले की, परिपत्रकात ‘मे’ असा शब्द वापरण्यात आला आहे.

### दिल्लीत एलपीजी घोटाळ्याचा पर्दाफाश

**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांनी दक्षिण आणि नैऋत्य दिल्लीत दोन बेकायदा एलपीजी होर्डिंग आणि रिफिलिंग रॅकेटचा पर्दाफाश केला असून एकूण २४८ सिलिंडर जप्त केले आहेत आणि पाच आरोपींवर कारवाई केली आहे. गुन्हे शाखेने संगम विहारमधील अनेक ठिकाणी छापे टाकून १८३ इंडेनचे १५४ भरलेले आणि २९ रिकामे सिलिंडर जप्त केले. पोलिसांनी सांगितले की, शेरसिंग, सूरज परिहार, रघुराज सिंह आणि जितेंद्र शर्मा या 4 डिलिव्हरी एजंटांचा अनधिकृत सिलिंडर रिफिलिंग करण्यात गुंतलेले आढळले.

## सोनिया गांधी रुग्णालयात दाखल; प्रकृती स्थिर, डॉक्टरांचे निरीक्षण सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांना पोटात संसर्गाची तक्रार झाल्यानंतर मंगळवारी रात्री दिल्लीतील सर गंगा राम रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.

रुग्णालयाच्या माहितीनुसार, सोनिया गांधी यांना मंगळवारी रात्री सुमारे १० : २२ वाजता उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यानंतर तातडीने त्यांची वैद्यकीय तपासणी सुरू करण्यात आली असून तज्ज्ञ डॉक्टरांची टीम त्यांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. अजय स्वरूप यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनिया गांधी यांच्या पोटात तसेच मूत्रमार्गात संसर्गाची



शक्यता लक्षात घेऊन सखोल तपासणी करण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार विविध चाचण्या सुरू असून त्यावर आधारित उपचार दिले जात आहेत. उपचाराचा भाग म्हणून त्यांना अँटीबायोटिक्स देण्यात येत आहेत. त्यांच्या प्रकृतीत सध्या स्थिरता असून कोणतीही गंभीर गुंतागुंत नसल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, काँग्रेस पक्षातील वरिष्ठ नेते व कार्यकर्ते त्यांच्या प्रकृतीबाबत सतत माहिती घेत असून त्यांच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना व्यक्त करत आहेत.

## विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ‘केआयआयएफबी’चा प्रभाव

# केरळमध्ये विकास, कर्ज आणि राजकारण यांचा संगम!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोच्ची :** केरळमध्ये विधानसभा निवडणुकीची चाहूल लागलेली असतानाच राज्यातील पायाभूत विकास प्रकल्पांभोवती राजकीय वातावरण तापले आहे. मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी अलाप्पुझा जिल्ह्यातील पेरुंबलम बेटासाठी सुमारे १०० कोटी रुपयांच्या पुलाचे उद्घाटन करत विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी आणला आहे. हा प्रकल्प केवळ स्थानिक मागणी पूर्ण करणारा नसून आगामी निवडणुकांमध्ये सत्ताधारी डाव्या आघाडीला राजकीय बळ देणारा ठरू शकतो, असे मानले जात आहे. राज्यातील बहुतांश मोठे प्रकल्प केरळ इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट फंड बोर्ड (केआयआयएफबी)



या विशेष यंत्रणेमार्फत राबवले जात आहेत. १९९९ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेचा उद्देश कर्ज उभारून पायाभूत सुविधा उभारणीला वेग देणे हा आहे. गेल्या काही वर्षांत रस्ते, पूल, जलमार्ग, शाळा, रुग्णालये अशा विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर प्रकल्प राबवले गेले असून त्याचा फायदा सर्वच पक्षांच्या आमदारांना त्यांच्या मतदारसंघात झाल्याचे दिसून येते. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत केआयआयएफबीमार्फत तब्बल ९९,६७६ कोटी रुपयांचे १,२१९ प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे ५२७ प्रकल्प, जलसंपदा विभागाचे १०४ प्रकल्प, आरोग्य क्षेत्रातील १०६ प्रकल्प, ऊर्जा क्षेत्रातील १८ प्रकल्प तसेच शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रकल्प यामधून राबवले गेले आहेत. या व्यापक गुंतवणुकीमुळे राज्यात पायाभूत सुविधांचा चेहरामोहरा बदलल्याचा दावा सत्ताधारी पक्षाकडून केला जात आहे. मात्र, या योजनेवर टीकेची झोडही उठत आहे. विरोधकांचा आरोप आहे की, केआयआयएफबीमुळे राज्याची आर्थिक शाश्वतता धोक्यात येत असून कर्जाचा बोजा वाढत आहे. काही तज्ज्ञांच्या मते, मोटार वाहन कर आणि इंधन अधिभारातून निधी वळविल्याने राज्याची आर्थिक ‘कोपर रूम’ कमी होत आहे. तसेच, प्रकल्प निवडीत स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका कमी असल्याने विकेंद्रीकरणाच्या तत्त्वालाही धक्का बसत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. याशिवाय, केआयआयएफबीवर पारदर्शकतेच्या अभावाचे आरोपही झाले आहेत. नियंत्रक आणि महालेखा परीक्षकांनी यापूर्वी कर्ज संरचनेवर प्रश्न उपस्थित केले होते, तर अंमलबजावणी संचालनालयाने काही प्रकरणांत नोटिसा बजावल्या होत्या. तथापि, सत्ताधारी पक्षाचे नेते थॉमस आयझॅक यांनी या सर्व आरोपांचे खंडन करत केआयआयएफबी ही पारदर्शक आणि सर्वसमावेशक यंत्रणा असल्याचे सांगितले आहे. राजकीय दृष्टिकोनातून पाहता, केआयआयएफबीचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे ‘अँटी-इन्कम्बन्सी’ कमी करण्याची क्षमता. विविध पक्षांचे आमदारही या निधीतून आपल्या मतदारसंघात विकासकामे करत असल्याने सत्ताविरोधी लाट कमी होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये विकास विरुद्ध कर्ज असा मुद्दा रंगण्याची शक्यता आहे. एकूणच, केरळमध्ये केआयआयएफबी ही केवळ आर्थिक किंवा पायाभूत सुविधा उभारणीची योजना न राहता ती राजकीय रणनितीचा केंद्रबिंदू बनली आहे. विकासाच्या दाव्यांबरोबरच आर्थिक शाश्वततेचे प्रश्न उपस्थित होत असताना, मतदार कोणत्या बाजूला कौल देतात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.